# प्रकरण सहावे

## आप्पासाहेब खोत यांची लेखनशैली आणि ग्रामीण कथालेखनातील योगदान.

# प्रकरण ६

## आप्पासाहेब खोत यांची लेखनशैली आणि ग्रामीण कथा लेखनातील योगदान:

मराठी ग्रामीण कथाविश्वात आप्पासाहेब खोत यांनी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. चौथ्या पिढीतील साहित्यिक जाण असणारा लेखक म्हणून एक आघाडीचा ग्रामीण कथालेखक म्हणून संपूर्ण महाराष्ट्र त्यांना ओळखतो आहे. त्यांनी आजवर चार कथासंग्रह, तीन कादंबरी, दोन चरित्रात्मक पुस्तके असे लेखन केले आहे. ग्रामीण जीवनाची स्थिती अन् गती यावरच त्यांचा साहित्यिक पिंड पोसला आहे. एक लेखक म्हणून मराठी ग्रामीण कथालेखकाच्यात आप्पासाहेबांचे योगदान महत्वपूर्ण आहे. सामाजिक बांधिलकी मानून समाज प्रबोधनाचा वसा चालणारा कथालेखक ग्रामीण संस्कृतीचे बदलते वास्तव दर्शन आपल्या साहित्यातून घडवित आहे. ते लिहितात - ग्रामीण साहित्यिकांनी ग्रामसंस्कृतीची जोपासना करणाऱ्या साहित्याची निर्मिती करावी. उदात्त व विधायक साहित्यामुळे संस्कृतीची जोपासना होते. विध्वंसक अश्लिल साहित्यामुळे ग्राम संस्कृतीला तडा जातो. जे जे मोठे ग्रामीण साहित्यिक झाले त्यांनी मातीवर व मातेवर, माणसांवर प्रेम केले म्हणून ते मोठे झाले. माती कधीही माणसाशी बेईमान होणारी नाही पण माणूस मातीशी बेईमान झाला तर ती माती त्या माणसाला मातीत मिसळल्याशिवाय राहत नाही. या विचारधारेतूनच त्यांनी आजवर लेखन केले आहे.[१] त्यांच्या 'गवनेर' कथासंग्रहात ग्रामीण संस्कृतीशी ग्रामीण माणसाशी नाते सांगणारा आहे. या संदर्भात प्रा. शशिकांत चौधरी लिहितात- ' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखन अनुदानातून प्रकाशित करण्यात आलेला 'गवनेर' हा आप्पासाहेब खोत यांचा पहिला वहिला कथासंग्रह आहे. यामध्ये अनुभवसंपन्न जीवनाचं दर्शन घडविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. मातृहृदयाचं महत्व पटवून देणारी दसऱ्याची कडाकणी परंपरा सांभाळत

बसणाऱ्या आणि स्वत:ला प्रतिष्ठित म्हणवून घेणाऱ्या बेगडी विचाराच्या माणसाच्या डोळ्यात अंजन घालणारी 'गोषा' कथा वशिल्याच्या दुनियेत बुध्दिवंतांचे चीज होत नाही याची जाणीव करून देणारी. 'उध्वस्त' कथा स्वार्थी भावाच्या डोळ्यात अंजन घालणारी तानी वाटमध्ये आहे. नवविचाराने भारलेली आकू. स्वाभिमानी यसवदा अशा कितीतरी व्यक्ती यात दिसतात. या संग्रहातील प्रत्येक कथेत मानवी जीवनातील ताण आणि तणावाचे सूत्रबध्द असं चित्रण आहे. त्यात जशी भोळीभाबडी माणसे आहेत तशीच बेरकीही आहेत. स्वार्थी आहेतही. माणसं कधी परंपरेनं भारलेली पहायला मिळतात तर कधी नव्या विचारांची कास धरणारी पहायला मिळतात. यात जीवावर होणारी स्वत:च्या अब्रुचं खोबरं केलं म्हणून डाव साधून कुऱ्हाडीनं घाव घालणारी आणि अब्रुचा बदला घेणारी गुतापा कथेतील चिमणी दुर्गेचा अवतार वाटते तर म्हाताऱ्या आई-बापापासून वेगळं राहू इच्छिणारा स्वार्थी सखा घात कथेत पहायला मिळतो. अंधश्रध्देवर टीका करणारी 'भोग' कथा लेखकाने लिहिली. नवीन आशय, नवीन विषयात आणि ज्वलंत समस्येना हात घालून त्यावर लेखन करण्यात लेखणी रममाण होते. त्यामुळे या संपूर्ण कथासंग्रहातील कथेची जी वीण आहे तीच मुळात ग्रामीण जीवनातील आणि त्यातल्या त्यात कौटुंबिक जीवनातील ताणतणावांचे चित्रण करणारी आहे. त्यामुळे हा कथासंग्रह वाचनीय झाला आहे.[२] हा प्रा. चौधरी यांचा अभिप्राय अतिशय बोलका आहे. या कथासंग्रहाचा बारकाईने अभ्यास केला तर यातील सर्व कथा समाजबप्रबोधनात्मक विचार प्रकट करत जातात. मानवी मनातील ग्रामीण जीवनातील विविध वृत्ती प्रवृत्तीचे दर्शन ती घडवितेच. पण माणसाला माणुसकीची शिकवण देते. समाजाच्या डोळ्यात अंजन घालण्यासाठीच की काय त्यांनी आपले कथाविश्व साकारले आहे. समाजातील देवदासीसारखी प्रथा ती कशी अनाठायी आहे हे दाखवलेच परंतु तिला प्रचंड विरोधही केला. 'भोग', 'अदावत' या अंधश्रध्देवरील कथातून लेखकाने समाजातील या विकृत प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. मानवी नात्यातील फोलपणावर भाष्य करताना त्यांनी घात, वाट, नाचारगत या कथातून प्रभावीपणे व्यक्ती उभ्या केल्या आहेत. लेखक खोत आपल्या कथातून समाज प्रबोधनात्मक विषय जाणीवपूर्वक हाताळताना दिसतात. ग्रामीण जीवन आज पूर्णपणे ढवळून निघाले आहे. त्यामुळे माणूस माणुसकी नाती-गोती विसरत आहेत. त्याचं प्रभावी दर्शन लेखक खोत यांनी

आपल्या कथांमधून घडवले आहे. हे मराठी ग्रामीण कथाविश्वात त्याचे फार मोठे योगदान आहे. आजवर मराठी साहित्यविश्वात सामाजिक आशय विषयातून लेखन करणारी बहुतेक मंडळी साहित्यातून जीवन आशय प्रकट करत होती. त्यात श्री. म. माटे, माडगुळकर, शंकर पाटील, आनंद यादव यांनी ग्रामीण जीवनाचे प्रत्येकानी आपआपल्या परीने कंगोरे टिपले आहेत. तथापि ग्रामीण जीवनाचं संपूर्ण बदलत्या जाणिवेशी चित्रण करण्याचं सामर्थ्य हजारात एखाद्या व्यक्तीलाच लाभतं. त्यापैकी आप्पा खोत हे एक आहेत. परंपरेच्या पाऊलवाटेने न जाता आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत वेगळाच आविष्कार करण्याचं सामर्थ्य त्यांना लाभले आहे. हे त्यांचे वाङमय वाचताना निश्चित जाणवेल. त्यांची कथा कादंबरी वाचताना त्यांची कथा सुरू करण्याची खास लकब आहे. आजवर असली ग्रामीण कथेत अभावानेच जाणवेल. ती संवादमय शैली. त्यातून उभी राहिलेली नाट्यात्मकता वाचकाला आकर्षित करून घेते. त्यांच्या कथेचा प्रारंभ हा नेहमीच वर्तमानात झालेला आहे तर पुन्हा ती कथा भूतकाळात रमते व शेवट ही वर्तमानात केला जातो. यात प्रा. श्याम माने यांनी बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब या लेखात कथा सूत्रातून लक्षात घेता कथा सुरू होवून पुन्हा भूतकाळात शिरते आणि कथेच्या शेवटी कथा पुन्हा पूर्ववत वर्तमानात येते. हा कथेचा फॉर्म नेहमीचाच त्याला फ्लॅशबॅक मेथड म्हटलं जातं. परंतु हीच पध्दत नेहमी वापरून चालत नाही असा आक्षेपही घेतला आहे.[३] तथापि कथानकाची मांडणी इतकी प्रभावीपणे होते की घटना प्रसंगाच्या नाट्यमयतेतून हे दिसून येत नाही. त्यामुळे हा फ्लॅशबॅक मेथडचा दोष मानला तरीही तो अधिक प्रभावीच, कलात्मक बनत जातो. चमत्कारी शब्दशैली वाक्य प्रयोग आणि नाट्यात्मकता या अंगाने त्यांनी प्रभावी अभिव्यकी केल्याने त्यांची कथा वाचक रसिकाला मंत्रमुग्ध करते यात वाद नाही.

ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण माणसाच्या व्यथा वेदनाचा आलेख होय. ह. ना. आपटेपासून ते आजअखेर मराठी ग्रामीण कथाविश्वाचा विचार केला तर आपणास ग्रामीण साहित्यात खेड्यातल्या माणसाच्या व्यथा वेदना आणि दु:ख यांचे चित्रण झाल्याचे दिसते. त्याला आप्पासाहेब खोत अपवाद नाहीत तथापि मराठी ग्रामीण कथा साहित्यात आप्पाच्या व्यथा वेदना दु:ख व्यक्त करण्याची वेगळीचं धाटणी आपणास दिसते. त्यांच्या कथेतील पात्रे, व्यक्ती ह्या दु:ख सहन

करण्यासाठी जन्माला आलेली दिसतात. काही मनातल्या मनात दु:ख पचवतात तर काहीजण ती इतरांच्या जवळ बोलून दाखवतात. त्यातूनच कथाबीज आकारात येते.आजवर ग्रामीण कथा वाङमयात कष्टकरी, मजूर, शेतकरी, स्त्री-पुरूष याचं चित्रण आलेले आपणास दिसते. गाव गाड्यातील व्यथा, वेदना आणि दु:खं या गावगाड्याचे म्हणून काही प्रश्न, श्रध्दा, अंधश्रध्दा यातून दु:खाशी सामना करत त्यांना जे जीवन जगावे लागते याचे चित्रण आले आहे. श्री. म. माटे यांनी उपेक्षितांचे अंतरंग आपल्या कथा साहित्यातून अभिव्यक्त केले. माणुसकीचा गहिवर मांडला गेला. व्यंकटेश माडगुळकरांनी माणदेश माणूस तो प्रदेशासह साकार केला. ग्रामीण माणसाचे मन त्याच्या दु:खासहित साहित्याचा विषय शंकर पाटील यांनी आणला तर निसर्ग आणि माणूस याचं अतूट नातं स्पष्ट करते. ग्रामीण संस्कृतीवर कृषी संस्कृतीचं होणारं आक्रमण आनंद यादव यांनी आपल्या कथा वाङमयात अभिव्यक्त केले आहे. त्याच परंपरेत आप्पासाहेब खोत यांनी १९९० नंतर ग्रामीण संस्कृतीमधील बदलत्या संवेदना अभिव्यक्त करताना माणूस केंद्र बिंदू ठेवून या माणसाच्या व्यथा, वेदना आणि दु:ख उपहासगर्भ व विसंगती साधत यांचे चित्रण केले आहे. शिवाय आजवर ग्रामीण स्त्रीचे पुष्कळ चित्रण आले आहे पण ग्रामीण विधवा स्त्रीचं दु:ख अभावाने आपणास पहावयास मिळे. आप्पा खोत यांनी ग्रामीण विधवा स्त्रीला आपला कथा विषय बनवून ग्रामीण कथा वाङमयात प्रथमच रांडमुंड बाईचं नवऱ्याच्या माघारी जगणं काय असतं हे दाखवून दिले आहे. हे सर्व चित्रण म्हणजे मराठी ग्रामीण कथा वाङमंय समृध्द करणाराचं एक भाग होय. आपल्या कथांमधून विधवाना समाजात जीवन जगताना भाऊबंदासंगे दोन हात करावे लागतात. अनेक डाव प्रतिडाव आखावे लागतात. ती स्त्री कशी करते यांचे प्रभावी दर्शन त्यांनी घडविले आहे. तोड कथेतील आक्कू स्वत: विधवा आहे आणि सूनही विधवा आहे तेव्हा रांडपण काय असते हे आक्कूने भोगले आहे. तेच आपल्या सुनेच्या वाट्याला येऊ नये म्हणून ती आपल्या विधवा सुनेचा लग्नाचा विचार करून लग्न करून देते. शिवाय शेती तिच्या नवऱ्याच्या नावावर करायचं ठरवते. अशा प्रकारे ग्रामीण विधवा स्त्री बदलत्या विचार जाणीवाना सामोरी जावून आपलं आयुष्य कुटुंबाचं अस्तित्व जपताना दिसते.

विधवा स्त्रीला जीवन जगताना जीव घेणारा संघर्ष करावा लागतो याचं

दिग्दर्शन खोत अतिशय प्रभावीपणे करतात. 'महापूर'मधील हिरा परिस्थितीशी झगडते. स्वाभिमान जागृत ठेवण्यासाठी भावाच्या घरातून बाहेर पडते. अखेर ती आपल्या बाळासह मृत्यूला सामोरे जाते. 'तोडगा' मधील विधवा मुलीसाठी राब-राब राबते. तिला संसाराला लावते पण मुलीचा उद्ध्वस्त संसार पाहून तिचे अंत:करण दु:खाच्या खाईत लोटते. दसऱ्याची कडाकणीमधील गिरजा नवऱ्याच्या माघारी मुलाला शिकवते. वाढवते. मोठा करते. दर दसऱ्याला आपल्या मुलाला गोड घास म्हणून मोठ्या कष्टाने कडाकणी बनवून देत असते. पण मुलगा आईला - गिरजाला नोकरी लागताच विसरतो. बायकोच्या अंकित होतो. याचं दु:ख उराशी बाळगून गिरजा विचारांच्या चक्रात फिरत राहते.

अशा प्रकारे ग्रामीण विधवा स्त्रियांच्या व्यथा, वेदना प्रथम मोठ्या संवेदनासह खोत यांनी कथाविषय बनवली आहेत. त्यांचे म्हणून आज जे प्रश्न आहेत त्या प्रश्नाकडे आणि त्यांच्या व्यथेकडे सहानुभूतीने पाहण्यासाठी आपल्या कथनशैलीने वाचकांना रसिकाना अंतर्मुख बनवतात.

आजच्या खेड्यातील दु:ख, दारिद्र्य, उपासमार वेशीवर टांगण्यात खोतांची कथा यशस्वी झाली आहे. हे दु:ख, ही उपासमार प्रस्थापित व्यवस्थेने ग्रामीण माणसांच्या जीवनात निर्माण केली आहे. या दृष्टीने परवड कथा पाहण्यासारखी आहे. दुष्काळी परिस्थितीत रामा आणि सीता मुलांसह रोजगार हमी योजनेच्या कामावर जातात. तेथील दिवाणजीचा आडमुठेपणा आणि सरकारी डॉक्टरांचा माणुसकीशून्य व्यवहार यामुळे रामा आणि सीताला पोटच्या मुलीला मुकावे लागते. याचे वास्तव, हृदयस्पर्शी चित्रण आले आहे. 'उध्वस्त' कथेतील वशिल्याच्या दुनियेत बुध्दिवंतांचे चीज होत नाही. नोकरीसाठी वणवण फिरावे लागते. तरीही नोकरी लागत नाही म्हणून आत्महत्या करण्याचा अयशस्वी प्रयत्न करणारा वसंता येथे भेटतो. ग्रामीण कुटुंबातील आईवडीलांची स्वप्नावत स्थिती पूर्ण करता येत नाही याचं अंतरिक दु:ख वसंताचे आहे ते या व्यवस्थेने निर्माण केल्याचे दिसते.

मराठी ग्रामीण कथेतून नवनवीन विषयाची हाताळणी लेखक खोत यांनी करून ग्रामीण कथेत मोलाची कामगिरी केली आहे. 'लेकावळा', 'नात्यानं बाप', 'मरणादारी', 'लागण' इ. 'लेकावळा' या कथेत जातीचा असूनही जातीबाहेर कसा ठेवला जातो. हे दाखवले आहे. लग्नाशिवाय संसार केला त्यातून मुलं जन्माला आली

तर त्यांच्या पुढील आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. याचे दर्शन लेखकाने गणपाच्या व्यक्तीरेखेतून मांडले आहे. 'नात्यानं बाप' ही कथाही वेगळेपण स्पष्ट करणारी आहे. मुलांना जन्म दिला एवढाच हक्क बापाचा आहे. ज्या बापाने मुलांना जन्माला घातले त्यांना योग्य मार्गाला लावले त्यांचे संसार उभे करून दिले ती मुले बापाला विचारत नाहीत. त्यांची हेटाळणी करतात त्याला वाईट वागणूक देतात. केवळ बाप आहे म्हणून महिन्याला १०० रूपये देतात. त्यामुळे या कथेतील बाप उद्विग्न होतो. असा वेगळा आशय मराठी ग्रामीण कथेत आला आहे. मरणादारी ही आप्पासाहेब खोत यांची ग्रामीण जीवनातील मृत्युसमयी माणसाच्या विविध प्रवृत्तींवर उपहासगर्भ भाष्य करणारी, मानवी विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवणारी पहिलाच ग्रामीण कथेत आले आहे. मृतकीच्या वेळी नात्यातील व नात्याबाहेरची माणसांची विविध प्रवृत्ती लेखकाने ओघवत्या शैलीत उपहासात्मक रितीने टिपली आहे. मरणाघरी आणि तोरणादारी माणसाने संयमाने बोलावे. दु:ख ज्याचे त्याला हा विचार देवून जाणारी ही कथा. आपले वेगळेपण ग्रामीण कथाविश्वात इतक्या प्रभावीपणे अभावानेच जाणवेल. शिवाय एड्स हा आधुनिक जगातील भयंकर रोग याचे प्रथमच ग्रामीण कथेत आप्पासाहेब खोत यांनी प्रतिबिंब उमटवले आहे. या रोगाने ग्रामीण जीवनातही प्रवेश केला आहे. अडाणी, अज्ञानी माणसाला त्यातले काही कळत नाही. त्यांच्या क्रिया प्रतिक्रिया लेखकाने नेमकेपणाने लागण या कथेत उमटविल्या आहेत.

माझ्या लेखनातील सर्व जाणिवा मला प्रत्यक्ष जीवनाच्या अनुभूतीतून मिळाल्या आहेत. त्यामुळे माझे कथा वाडमय मी विविधतेने आणि मोठ्या जिव्हाळ्याने परिपूर्ण केले आहे. स्वत: लेखकाने मान्य केले आहे. शिवाय साहित्य हे उद्बोधनाचे साधन मानून समाजाचे होणारे अध:पतन साहित्यिक आपल्या लेखनाने थोपवतात. समाज ऋण मानून समाजाला काही मुल्यधारा देणं हा वसा लेखक खोत यांनी उचलला आहे. ज्या परंपरेतून लेखक पुढे आला त्या परंपरेविषयी त्याला सार्थ अभिमान आहे तो माती, नाती आणि नीती कशी अबाधित राहिली यासाठी आप्ली लेखणी झिजवतो. त्यासाठी नव्या जुन्या संस्कारशील मूल्यधारा प्रकट करतो. माणसानं बदलावं पण किती हा लेखक खोत यांच्यापुढे आ वासून प्रश्न आहे. ज्या खेड्यात अर्धी चतकोर भाकरी वाटून खाल्ली जात होती. त्याच खेड्यात आज

भाकरी आज भाकरी हिसकावून घेण्याची विकृती आली. वासनेचा आणि लबाडीचा, लाचारीचा, फसवेगिरीचा कल्लोळ आज खेड्यात होताना दिसतो. स्वत:च्या स्वार्थासाठी रक्ताचं नातं विसरलेली माणसं एकमेकांवर तुटून पडू लागली. गावा-गावात, समाज-समाजात निष्ठा, प्रेम, जिव्हाळा, त्याग, सारं-सारं संपलं. खाणं पिणं आणि भोगणं यासाठीच आजची तरूणपिढी वेडी झाली. रिकामं फिरणं आलं आणि त्यातून मग नको ते करणं आलं. संधीसाधू याचा उपयोग करू लागले. कोठेही आणि कशातही स्थिरता राहिली नाही. अस्थिरतेने परिस्थिती नाजूक बनली. बेगडी नकली जीणं आलं त्यामुळे जे चांगले आहे त्याचा नाश झाला. या सर्व जाणीवाच व्यथा, वेदना, संवेदनशील लेखक आप्पासाहेब खोत यांना बोचत राहिल्या. हे कुठं तरी थांबायला हवं. कुणी तरी सांगायंला हवं. या उर्मीतून त्यांनी आपल्या कथा प्रबोधनात्मक वसा घेऊन साकार केल्या आहेत असे दिसते. ते मराठी ग्रामीण कथेत निश्चित वेगळा ठसा उमटवून गेले.

आजवर संपूर्ण महाराष्ट्रात दोन हजारावर कथाकथनचे कार्यक्रम करणारे खोत ग्रामीण कथेला त्यांनी मोठे योगदान दिले आहे असे निश्चितच म्हणावे लागते. शंकर पाटील, द. मा. मिरासदार, वामन होवाळ यांच्या परंपरेत त्यांच्या कथेचा वेगळेपणा लक्षात येतो. खोत यांच्याबरोबर कडेगावचे आनंदराव पाटील, विदर्भातल्या प्रतिमा इंगोळे यांनीही कथाकथनाची परंपरा समर्थपणे पुढे सुरू ठेवली आहे. तरीही खोत यांची आघाडी आहे हे कुणाला नाकारता येणार नाही. श्री. विजय चोरमारे यांच्या लेखात - 'मुळात कथाकथन या प्रकारावर अनेक बुजुर्गांनी टीका केली आहे. कथाकथन करणाऱ्या ग्रामीण लेखकांनी खेड्यातल्या माणसांच्या दु:ख , दैन्याबद्दल बोलण्याऐवजी त्या माणसाला टिंगलटवाळीचा विषय बनवले. त्यांच्या टोप्या उडवल्या. हा मुळातला आक्षेप आहे आणि या लेखकांनी तीन-चार कथाच सर्वत्र सांगितल्या असा आणखी एक आक्षेप घेतला जातो. या दोन्ही आक्षेपात तथ्य आहे. वाङ्मयाकडे गांभीर्याने पाहणाऱ्या लेखक-समीक्षकांच्या पहिल्या आक्षेपाचा तितकासा ताकदीने प्रतिवाद करता येत नाही. परंतु दुसऱ्या आक्षेपाबद्दल असे म्हटले जाते की, प्रत्येक ठिकाणी श्रोते वेगळे असतात. त्यामुळे त्याच त्या कथा सांगितल्या तरी फरक पडत नाही.

तथापि, मराठीतल्या कथाकथनकारांनी खेड्यातल्या माणसाली हसण्याचा



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विषय बनवले असा आक्षेपही श्री. होवाळ आणि श्री. खोत यांच्या बाबतीत घेता येत नाही. कारण श्री. होवाळ यांनी ज्या कथा सांगितल्या त्यातून अंधश्रध्दा कर्मकांडाविरोधात विचार मांडले. एका अर्थाने समाजपरिवर्तनाचे हत्यार म्हणून कथाकथनाचा वापर केला. आप्पासाहेब खोत यांनी मराठी ग्रामीण कथाकथनात ही वेगळी पाऊलवाट सुरू केली आहे. खोत यांनी ग्रामीण समाज जीवनातील मनुष्य स्वभावातील विसंगती प्रभावीपणे टिपण्यात ते यशस्वी झाले आहेत. या विसंगतीतून निर्माण होणारा विनोद हा वेगळ्या दर्जाचा विनोद बनतो. खळखळून हसायला आणि निरीक्षण शक्तीला दाद द्यायला लावतो. परंतु ते कधी माणसांची टिंगल टवाळी करीत नाहीत. दोषावर अचूक बोट ठेवतात. विसंगतीही टिपतात. त्याचबरोबर भाबड्या भावनांचे कल्लोळ आणि दु:ख दैन्याचे दर्शनही घडवतात.[४] या दृष्टीने त्यांची गवनेर, 'कोंबडी,' ' मरणदारी ' या कथा ऐकण्यासारख्या आहेत. मराठी ग्रामीण कथाविश्वात स्वत:ची खोतीशैली निर्माण करणारे लेखक म्हणून आज महाराष्ट्र त्यांना ओळखतो आहे. त्यांच्या कथाकथनविषयी श्री. वामन होवाळ यांनी जो अभिप्राय व्यक्त केला आहे तो असा 'कथा कशी सांगावी याचे जन्मजात भान आप्पासाहेब खोत यांना आहे. त्यांची शैली इतकी स्वतंत्र आहे की त्याचे अनुकरण कुणाला करता येत नाही.' [५] प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी 'समाजात जे परिवर्तन होत आहे. माणसा-माणसांमध्ये दुरावा वाढतो आहे याचे प्रभावी चित्रण आप्पासाहेबांच्या कथांतून घडते. माणुसकीची कणव असलेल्या त्यांच्या कथा काळजाला भिडतात. दक्षिण महाराष्ट्रात कथाकथनाची मोठी परंपरा आहे. माडगुळकर बंधू, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, शंकर खंडू पाटील ही सर्व मंडळी दक्षिण महाराष्ट्रातील आहेत. त्यांचीच परंपरा आप्पासाहेब खोत समर्थपणे पुढे चालवीत आहेत.'[६] असे मत मांडले.' ते त्यांच्या कथाकथनाच्या कार्यक्रमातून सिध्द होत राहते.

अनेक साहित्य संमेलनातून व्याख्यानमालातून आणि सांगली - कोल्हापूर आकाशवाणी केंद्रावर त्यांच्या कथाकथनाचे कार्यक्रम झाले आहेत. शिवाय अरूण कचरे प्रस्तुत कुणाल म्युझिकलने आतापर्यंत दोन कॅसेटस् त्यांच्या प्रकाशित केल्या आहेत. त्या कॅसेटमध्ये "मरणादारी, गवनेर, कोंबडी " या तीन कथांचा समावेश आहे. यातून समाज प्रबोधनाचा वसा प्रकट झाल्याचे लेखकाच्या निवेदनातून स्पष्ट होते. मरणादारी कथेच्या अगोदर लेखक सांगतो - "मातीत राबणाऱ्या हाताना गरीबी

हा शाप आहे. जेव्हा माणसाचा बोलणारा शब्द आणि उचलणारे पाऊल स्वार्थापोटी येतो तेव्हा बहिण-भावाच्या नात्यालासुध्दा तडा जातो. मरणादारी आणि तोरणादारी माणसानं संयमानं बोलावं. दुःख हे ज्याचं त्याला त्यानंच ते पचवायला हवं अशावेळी आपण त्याच्या दुःखाकडे सहानुभूतीनेच पहायला हवं.

'गवनेर' कथेच्या अगोदर केलेले निवेदन - "मुक्या प्राण्यांना माणसानं जीव लावला तर मुका प्राणी माणसासाठी जीव देतो म्हणून आजच्या यंत्रयुगात माणसानं माणसाला जीव लावण्याची नितांत गरज आहे.'

कोंबडी कथेच्या प्रस्तावनेत - घराघरातील साध्या साध्या गोष्टीतील भांडण हुंबऱ्याच्या आत असावीत नाहीतर मग घराचं घरपण संपून जातं.

अशाप्रकारे आप्पासाहेब खोत यांनी आपल्या शब्दशैलीतून समाज जागृतीसाठी कथेच्या प्रारंभी मौलिक विचार प्रकट केले आहेत. शिवाय कथा निवेदनातूनही त्यांनी अनेक उपहासगर्भ भाष्ये केली आहेत. अनेक भावकल्लोळाच्या हिंदोळ्यावर रसिक वाचकाला या कथा दृढमुल करतात. गर्दीला आकर्षक करतात. त्यांचे वेगळेपण निश्चितपणे दिसतेच तथापि २१व्या शतकातही ग्रामीण कथेला बळ देणारा कथाकार म्हणून आप्पासाहेबाचा आवूर्जन उल्लेख करावाच लागेल. त्यांना आतापर्यंत महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचा ग. ल. ठोकळ पुरस्कार, आचार्य प्र. के. अत्रे साहित्य पुरस्कार असे पुरस्कार मिळाले आहेत. तर माचीगड साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, आचार्य अत्रे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आयोजित पाचवे आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असे मान-सन्मान प्राप्त झाले आहेत. आपल्या साहित्याविषयी ते लिहितात - जे मी जगलो, तेच मी मांडत गेलो. स्वानुभव व निरीक्षणातून संपूर्ण चित्रण केले आहे. आजच्या खेड्यातील माणूस केंद्रीभूत ठेवून संपूर्ण लेखन केले आहे. या ग्रामीण माणसाला टिंगलीचा विषय न करता त्या माणसाकडे सहानुभूतीने पहायला लावले आहे. शिवाय ग्रामीण माणूस आपल्या जगण्यातून इतराना जगण्याची प्रेरणा देतो हे साध्य करण्यासाठीच त्यांनी जणू आपले कथाविश्व साकार केले आहे. माणुसकी-मानवता हे जवळ जवळ सर्व कथांचा आत्मा आहे. ग्रामीण कथेत - प्रथितयश ग्रामीण कथाकाराच्या चोखाळलेल्या वाटेने जाताना १९८० नंतर आपल्या कथा लेखनाची वाट लेखक खोत यांनी वेगळेपणाने शोधली आहे. त्यांच्या कथालेखनाचा प्रारंभ, लेखनातील संवादात्मकता व नाट्यात्मकता,

ग्रामीण जीवनाचे प्रभावी व परिणामकारक चित्रण विविध व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून व समाजातील स्थितीगतीच्या ताणतणावाचे चित्रण करताना आप्पासाहेब खोत यांची कथा समाज प्रबोधनाचा वसा घेऊन आपल्या खास लकबीने आणि त्यांच्याच म्हणून खास शैलीने मराठी कथेमध्ये एक अभिनव रूप धारण करते. परंपरेच्या पांगुळगाड्यात न अडकता स्वत:ची नवी वाट शोधण्याचा ध्यास हा आप्पासाहेब खोताच्या प्रतिभेचा एक नवा आविष्कार निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे. हे मराठी कथेतील एक अनन्यसाधारण योगदान म्हणावे लागेल.

**संदर्भ टीपा :-**

१) माचीगड ता. खानापूर जि. बेळगांव येथील दुसरे ग्रामीण साहित्य संमेलन. लेखक खोत यांच्या अध्यक्षीय भाषणाची लिखित प्रत

२) प्रा. शशिकांत चौधरी : दै. कृषीवल ५ जाने. १९९२ अंक ग्रंथ परिवारात लेख

३) प्रा. शाम माने यांचा लेख. बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब. ७ नोव्हे. १९९९. दै. पुढारी : रविवार पुरवणी पृ. ३

४) श्री. विजय चोरमारे : कथाकथनातला दमदार आवाज लेख : दै. सकाळ : कोल्हापूर आवृत्ती १३ मे २००२ पृ. ६

५) दैनिक सकाळ : कोल्हापूर आवृत्ती : १४ मे २००२ पृ. ४

६) तत्रैव : तत्रैव : तत्रैव : तत्रैव : पृ. ४